# तलाठी पदभरती २०१९ बाबत सुचनापत्र.

महापरीक्षा पोर्टल मार्फत उपलब्ध डाटावरुन नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ अंतर्गत मुळ कागदपत्र तपासणीअंती, जिल्हा निवड समितीची बैठक घेवुन शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१६/(प्र.क्र. ६५/१६)/१३-अ दि १३ जुन, २०१८ व शासन निर्णय क्र.बीसीसी -२०१८/प्र.क्र.५८१ ए/१६-ब दि.०४ जुलै २०१९ मधील तरतुदीनुसार तलाठी पदाची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी तसेच सुचनापत्र या कार्यालयाचे अधिकृत संकेत स्थळ http://nanded.nic.com वर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

तसेच वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५ अर्थ -३ दि. ०४.०५.२०२० अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नविन भरती करु नये असे निर्देश दिलेले आहेत, त्यानुषंगाने तलाठी अंतिम निवड यादीनुसार पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाची परवानगी मागविण्यात आली व त्यानुषंगाने कक्ष अधिकारी महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. तलाठी -२०१९/प्र.क्र. २२७ (अ)/ई-१० दि. ३१ जुलै २०२० अन्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.

" जिल्हाधिकारी औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांनी विहीत भरती प्रक्रिया अवलंबून अंतिम निवड यादी प्रसिध्द केली असली तरी, सदर निवड यादीनुसार उमेदवारांना नियुक्ती देणे/पदभरती करणे योग्य नाही. सध्या दि. ४ मे २०२० च्या शासन निर्णया नुसार पदभरती करु नये. पदभरतीवरील निर्बंध उठल्यानंतर पुढिल निर्णय घेण्यात यावा. तसेच निवड यादी पुढिल एका वर्षापर्यंत वापरण्याबाबत विभागाने सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.

(सोबत- शासनाचे मार्गदर्शनाचे पत्र)

जिल्हाधिकारी नांदेड करीता

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३७५४ email ID : doe10.rfd@maharashtra.gov.in / sandip.bagul@nic.in

**क्र.तलाठी-२०१९/प्र.क्र.२२७(अ)/ई-१०** **दिनांक- ३१ जुलै, २०२०**

**प्रति,**

**विभागीय आयुक्त,**
**कोकण / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर**

**विषय :-** **तलाठी पदभरती-२०१९**
नियुक्ती आदेशाबाबत.

**संदर्भ :-** (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि. ४ मे, २०२०
(२) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०२०/मशाका/आस्था-१/भरती/तलाठी/प्र.क्र., दि.१८.०५.२०२०
(३) जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र क्र.२०१९/मशाका/आस्था-२/प्र.क्र./, दि.०१.०६.२०२०

**महोदय,**

सन-२०१९ मध्ये राज्यातील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याची भरतीप्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यानुसार काही जिल्हाधिकारी कार्यालयांनी भरती प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिलेली आहे. तर काही जिल्हाधिकारी कार्यालयांची भरती प्रक्रिया अंतिम टप्यात असताना दरम्यानच्या कालावधीत वित्त विभागाने संदर्भाधीन दि. ४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये, असे निर्देश दिलेले आहेत.

२. भरती प्रक्रिया अंतिम टप्यात असलेल्या जिल्हाधिकारी औरंगाबाद आणि नांदेड या कार्यालयांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये पदभरतीवर निर्बंध असल्याकारणास्तव, तलाठी पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश द्यावे किंवा कसे ? याबाबत मार्गदर्शनार्थ शासनास विनंती केली होती. सदर विनंतीस अनुसरुन त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने पुढील प्रमाणे निदेश दिले आहेत :-

***जिल्हाधिकारी, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, नांदेड यांनी विहीत भरती प्रक्रिया अवलंबवून अंतिम निवड यादी प्रसिध्द केली असलीतरी सदर निवड यादीनुसार उमेदवारांना नियुक्ती देणे / पदभरती करणे योग्य नाही.***

***सध्या दि. ४ मे, २०२० च्या शासन निर्णया नुसार पदभरती करु नये. पदभरतीवरील निर्बंध उठल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात यावा. तसेच निवड यांदी पुढील एक वर्षापर्यन्त वापरण्याबाबत विभागाने सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.***

३. वित्त विभागाच्या उक्त निदेशानुसार सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांनी त्यांचे अधिनस्त जिल्हाधिकारी कार्यालयाना तत्काळ निदेश देण्यात यावेत. ज्या जिल्हाधिकारी कार्यालयांची पदभरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, अशा जिल्हाधिकारी कार्यालयांनी त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास त्वरीत सादर करावा. तसेच **ज्या जिल्हाधिकारी कार्यालयांची पदभरती प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, अशा जिल्हाधिकारी कार्यालयांना, निवड यादी पुढील एक वर्षापर्यंत वापरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेकरीता, आपल्या मार्फत प्रस्ताव शासनास विनाविलंब सादर करण्याचे निदेश देण्यात यावेत**, ही विनंती.

आपला

(र. धों. कटके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत :- माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.**
**सर्व जिल्हाधिकारी**